# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.04.2026** **वारः रविवार**

---

1. -अमेरिका आणि इराण यांच्यातली युद्धबंदीबाबतची चर्चा निष्फळ
2. -पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुकांसाठीचा प्रचार शिगेला
3. -बिहारमधील कटिहार जिल्ह्यात रस्ते अपघातात 13 जणांचा मृत्यू आणि
4. -'महिलांच्या कॅन्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धे'त भारतीय ग्रँडमास्टर आर. वैशालीची आघाडी कायम

**अमेरिका आणि इराण-बैठक**

पश्चिम आशियातील संघर्षाबाबत तोडगा काढण्यासाठी, अमेरिका आणि इराण यांच्यात पाकिस्तानातल्या इस्लामाबाद इथं कालपासून सुरू असलेली बैठक नुकतीच संपली. जवळ जवळ 21 तास चाललेली ही चर्चा कोणताही करार न होता संपुष्टात आली आहे. ही चर्चा महत्त्वपूर्ण होती; पण त्यातून कोणताही ठोस निष्कर्ष निघाला नाही, असं अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे डी व्हान्स यांनी सांगितलं.

इराणने अण्वस्त्र विकसित न करण्याबाबत स्पष्ट आणि दीर्घकालीन हमी द्यावी, ही अमेरिकेची मागणी आहे; मात्र इराणने या अटी मान्य केल्या नाहीत, ही चर्चा निष्फळ झाली असली तरी अमेरिकेनं अंतिम आणि सर्वोत्तम प्रस्ताव इराणसमोर ठेवला आहे; आता अमेरिकेला इराणकडून प्रतिसादाची प्रतीक्षा आहे, असं व्हान्स म्हणाले.

तत्पूर्वी इराण सरकारनेही समाज माध्यमावरील संदेशातून; काही मतभेद कायम असले तरी संवाद सुरू ठेवला जाईल, असे संकेत दिले होते.

अमेरिका आणि इराण यांच्यातील गेल्या अनेक दशकातील ही सर्वात महत्त्वाची थेट चर्चा मानली जात होती; पश्चिम आशियातील तणाव कमी करणे, युद्धविरामासाठी प्रयत्न करणे, अमेरिकेकडे असलेली इराणची मालमत्ता मुक्त करणे, तसेच होर्मुज सामुद्रधुनीतील सध्या स्थिती हे या चर्चेचे प्रमुख मुद्दे होते.

दरम्यान, दोन्ही देशांमध्ये करार झाला असो किंवा नसो अमेरिकेनं आधीच विजय मिळवला असल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनीही इराणविरोधातील युद्ध अद्याप संपलेलं नसल्याचं म्हटलं आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर संयुक्त अरब अमिरातीच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी काल संयुक्त अरब अमिरातीचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाह्यान यांची भेट घेतली. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेला तणाव आणि या प्रदेशातील भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत तसंच या प्रदेशातील बदलती परिस्थिती आणि त्याचे संभाव्य परिणाम यावर प्रामुख्यानं या भेटीत चर्चा झाली. दोन्ही देशांमधील सहकार्य आणि 'सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी' अधिक दृढ करण्यावर या बैठकीत जोर देण्यात आला.डॉ. जयशंकर तसंच केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांचा आखाती देशांचा दौरा हा पश्चिम आशियातील बदलत्या प्रादेशिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारताची 'ऊर्जा सुरक्षा' अधिक मजबूत करण्याच्या प्रयत्नांचाच एक भाग असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**प.बंगाल-निवडणुक**

पश्चिम बंगालमध्ये राज्य विधानसभा निवडणुकांसाठीचा प्रचार सध्या जोरात सुरू आहे. विविध राजकीय पक्षांचे दिग्गज नेते राज्याच्या विविध भागांमध्ये आयोजित जाहीर सभा आणि प्रचार फेऱ्यांमध्ये सहभागी होत आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजण्याच्या सुमारास सिलिगुडी इथल्या कावाखाली इथं एका जाहीर सभेला संबोधित करतील. तृणमूल काँग्रेसचे अखिल भारतीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांच्या हुगळी इथल्या डनलॉप फॅक्टरीच्या मैदानावर होणाऱ्या जाहीर सभेची तयारी सध्या जोरात सुरू आहे. ही सभा आज चिन्सुराह आणि सप्तग्राम विधानसभा मतदारसंघांतील उमेदवारांच्या समर्थनार्थ आयोजित करण्यात आली आहे.

**तामिळनाडू**

तमिळनाडूमध्येही विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते आणि केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी काल प्रचार सभा घेतली. केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते एल मुरूगन यांनीही विविध ठिकाणी प्रचार केला. द्रमुक प्रमुख आणि मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी पुदुक्कोट्टई येथे रोड शो केला.

**साधना सप्ताह**

साधना सप्ताह 2026 मध्ये 3 कोटी 18 लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. 2 ते 10 एप्रिलदरम्यान आयोजित या मोहिमेनं, भविष्यासाठी सज्ज, नागरिक-केंद्रित आणि क्षमता-चालित नागरी सेवा परिसंस्था उभारण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला अधिक दृढ केले.

केंद्रीय कार्मिक, सार्वजनिक तक्रार आणि निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या माहितीनुसार 46 लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांनी किमान एक अभ्यासक्रम पूर्ण केला, तर 33 लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांनी चार तासांहून अधिक काळ शिक्षण घेतले.

**FASTag**

देशभरातील राष्ट्रीय महामार्गांवरील टोल प्लाझांवर आकारलं जाणारं सर्व 'वापरकर्ता शुल्क' 10 एप्रिलपासून केवळ 'FASTag' किंवा UPI यांसारख्या डिजिटल माध्यमांद्वारेच स्वीकारलं जात असल्याचं, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. सध्या सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेमुळं लागू असलेल्या 'आचारसंहिते'च्या पार्श्वभूमीवर, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये, तसंच पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात मात्र हा बदल अद्याप लागू करण्यात आलेला नसल्याचं मंत्रालयानं पुढं म्हंटलं आहे.

**एलपीजी**

24 भारतीय कर्मचाऱ्यांद्वारे संचलित भारतीय ध्वज धारण करणारे 'जॅग विक्रम' हे जहाज पर्शियन आखाताच्या क्षेत्रातून यशस्वीरित्या बाहेर पडलं असल्याचं केंद्रीय बंदरेआणि जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितले. या जहाजावर 20 हजार 412 मेट्रिक टन एलपीजीवाहून नेला जात असून, हे जहाज या महिन्याच्या 15 तारखेला भारतात पोहोचण्याचा अंदाज असल्याची माहिती समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये सोनोवाल यांनी दिली.

**निर्यात शुल्क**

सरकारनं डिझेलवरील निर्यात शुल्क साडे 21 रुपये प्रति लिटरवरून वाढवून साडे 55 रुपये प्रति लिटर केलं आहे. अर्थ मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, विमान इंधन शुल्कही साडे 29 रुपये प्रति लिटरवरून वाढवून 42 रुपये प्रति लिटर करण्यात आलं आहे. दरम्यान, पेट्रोलवर सध्या निर्यात शुल्क आकारण्यात येत नसून या निर्णयात कोणताही बदल नाही.

**चंचल कुमार**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी मुंबई इथल्या NFDC अर्थात 'राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ' संकुलाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी प्रसारमाध्यमे आणि चित्रपट क्षेत्रातील प्रमुख संस्थांच्या अधिकाऱ्यासोबत अनेक बैठका घेतल्या, तसंच विविध कामांचा आढावा घेतला. NFDC संकुलात आयोजित वृक्षारोपण मोहिमेत त्यांनी सहभाग घेतला आणि IICT च्या सुविधांनाही काल भेट दिली.

**बिहार-अपघात**

बिहारमधील कटिहार जिल्ह्यात एका बसची आणि पिकअप वाहनाची धडक होऊन झालेल्या अपघातात 13 जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. हा अपघात काल सायंकाळी 6 वाजण्याच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग 31 वरील कोढा ब्लॉकमधील 'बसगढा चौक' जवळ घडला; या घटनेत एका दुचाकीस्वाराचाही मृत्यू झाला आहे. सर्व जखमींना उपचारांसाठी कोढा प्राथमिक आरोग्य केंद्र आणि पूर्णिया वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. समाज माध्यमावरील पोस्ट मध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीतसंच पंतप्रधानांनी शोकाकुल कुटुंबांप्रती संवेदना व्यक्त करून जखमींच्या प्रकृतीत सुधारणेसाठी प्रार्थना केली. पंतप्रधानांनी मृत्युमुखी पडलेल्यांच्या निकटच्या नातेवाईकांना 'पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी'तून प्रत्येकी दोन लाख रुपयांची तर जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांचीमदत जाहीर केली.मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतानाअशाच आर्थिक मदतीची घोषणा केली.

**बुद्धिबळ**

बुद्धिबळामध्ये, सायप्रसमधल्या पेइया इथं काल रात्री पार पडलेल्या 'महिलांच्या कॅन्डिडेट्स स्पर्धे'च्या 11 व्या फेरीत, अलेक्झांड्रा गोर्याचकिनावर निर्णायक विजय मिळवून, भारतीय ग्रँडमास्टर आर. वैशालीनं आपली आघाडी कायम राखली आहे. या विजयामुळं तिची गुणसंख्या सातवर पोहोचली असून, आता स्पर्धेच्या केवळ तीन फेऱ्या बाकी आहेत. तर दिव्या देशमुखनं चीनच्या झू जिनरला बरोबरीत रोखलं. खुल्या गटात मात्र, आर. प्रज्ञानंद याचा संघर्ष सुरूच राहिला; त्याला जर्मनीच्या मथायस ब्लूबाउमविरुद्ध बरोबरीवर समाधान मानावं लागलं.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल रात्री चेन्नई इथल्या एम.ए. चिदंबरम मैदानावर चेन्नई सुपर किंग्सनं दिल्ली कॅपिटल्सचा 23 धावांनी पराभव करत, यंदाचा आपला पहिला विजय नोंदवला. संजू सॅमसनला 'सामनावीर' म्हणून गौरवण्यात आलं.अन्य सामन्यात, न्यू चंदीगडमधील मुल्लानपूर इथं पंजाब किंग्सनंसनरायझर्स हैदराबादचा गडी राखून पराभव केला. आयपीएल मधील आजच्या सामन्यांमध्ये, दुपारी साडे वाजता लखनऊ सुपर जायंट्सचा सामना गुजरात टायटन्सशी होईल, तर सायंकाळी साडे वाजता मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे संघ आमनेसामने येतील.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात, ओडिशा, तामिळनाडू, पुदुच्चेरी आणि कराईकल या भागांत उद्यापर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. तर ईशान्य भारतात पुढील दोन दिवसांत विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. तसंच, पश्चिम बंगाल, केरळ, माहे, दक्षिण अंतर्गत कर्नाटक, लडाख आणि जम्मू-काश्मीर या भागांतही आज अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.